# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

क्र : मविनिआ/माअअ/29/2018/ 0532

दि.23.04.2018

प्रति,
श्री. आर.डी.गुप्ता,
B/४०२, रामदेव पॅराडाईस,
इन्द्रलोक फेस-६, राधे कृष्ण मंदिराजवळ,
भाईंदर (पूर्व) - ४०१ १०५.

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. १७.०४.२०१८ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No. | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.ही कंपनी मुंबई उपनगरला वीज पुरवठा करणारी कंपनी ही कंपनी अदानी ट्रान्समिशन लि. ह्या कंपनीला विक्री करण्यात आली., तर ह्या व्यवहारास व रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. ह्या कंपनीकडे वीज वितरण करण्याचा असलेला परवाना व ह्या संदर्भात आपल्या आयोगामार्फत मान्यता व परवाना विकण्यात आलेल्या कंपनीला देण्यासंदर्भात मान्यता देण्यात आली असेल तर त्याची लेखी माहिती द्यावी. व तसेच ह्या व्यवहारसंदर्भात संबंधित कंपन्यांकडून आपल्या कार्यालयास केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व त्यावर केलेल्या कार्यवाहीचा लेखी तपशील द्यावा, ही विनंती. | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी आपल्या वीज वितरण व पारेषण परवान्याच्या हस्तांतरणासाठी आयोगाकडे प्रकरण क्र.140/2017 व 139/2017 मध्ये याचिका दाखल केल्या आहेत. सदर याचिका न्यायप्रविष्ट आहेत व याबाबतीत विद्युत अधिनियम 2003 व त्याअंतर्गत बनविण्यात आलेल्या विनिमयांतील तरतुदींनुसार प्रक्रिया सुरु आहे. |

सदर उपलब्ध करुन दिलेली माहितीबद्दल आपले समाधान न झाल्यास आपण प्रथम अपीलीय अधिकारी श्री अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई यांचेकडे सदर पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसाच्या आत प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
Tel.: 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 Fax : 022-2216 3976
E-mail : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in Website : www.merc.gov.in / www.mercindia.org.in